महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/लोकआयुक्त / २०२२/4245 दिनांक : 08 SEP 2022

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था

**विषय : राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२२ - २३ या वर्षाकरीता दि. २० ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरावर राबविण्याबाबत**

**संदर्भ :** १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/लोकआयुक्त/२०२२/२८३ दि.०८/०९/२०२२

२. शासन पत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र. १०५/आस्था २, दि. २२.०८.२०२२

३. शासन पत्र अ.शा.प.क्र.रांगाअ ११२२/प्र.क्र.४०/१८-अ, सा.प्र.वि./ दि. १७.०८.२०२२

**उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र वाचावे.**

उपरोक्त विषयाचे तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे प्राप्त पत्रानुसार कळविण्यात येते की, शासन पत्र सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२२ – २०२३ या वर्षाकरीता शासन निर्णय दि. ०३.०२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ येथे १ ते ७ मध्ये नमूद तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व शासकीय संस्थाप्रमूख यांना सूचित करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी शासनामार्फत व संचालनामार्फत दिलेल्या संदर्भ क्र. १ आणि ३ चे पत्राचे अवलोकन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास **info.dteropune@gmail.com या ईमेलव्दारे** तात्काळ सादर करण्यात यावा, जेणेकरुन सदर अहवाल संचालनालयास व शासनास लवकरात लवकर सादर करणे शक्य होईल.

सोबत - संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत : १. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http//www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/लोकआयुक्त/२०२२/ २८३ दिनांक : 8 SEP 2022

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

**विषय : राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२२-२३ या वर्षाकरीता दि.२० ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरांवर राबविण्याबाबत**

**संदर्भ : या संचालनालयामार्फत ईमेल द्वारे पाठविण्यात आलेले शासन पत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०५/आस्था २, दि.२२.०८.२०२२**

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे.

संदर्भाधीन ईमेल सोबतच्या शासन सामान्य प्रशासन विभागाचया दि.१७.०८.२०२२ च्या पत्रान्वये, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२२-२३ या वर्षाकरीता सर्व स्तरावर राबविण्याकरीता शासन निर्णय दि.०३.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ येथे १ ते ७ मध्ये नमूद तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी शासनामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ सादर करावा.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
Email: do.asthahte-mh@gov.in

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०५/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक: २२ ऑगस्ट, २०२२.

प्रति,

१) सर्व सहसचिव/उपसचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

२) संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय)
पुणे/मुंबई.

विषय : "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२२-२३ या वर्षाकरीता दिनांक २० ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरांवर राबविण्याबाबत...

संदर्भ : मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे अ.शा.प.क्र. रागांअ-१११२/प्र.क्र.४०/१८-अ, दि.१७.०८.२०२२ रोजीचे पत्र.

महोदय,

मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. (प्रत सोबत जोडली आहे)

२. "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२२-२३ या वर्षाकरीता सर्व स्तरावर राबविण्याच्या अनुषंगाने आपल्या कार्यासन/कार्यालयातील संबंधितांना योग्य त्या सूचना देण्याबाबत संदर्भीय पत्राद्वारे सूचित करण्यात आले आहे. कृपया याबाबत उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(मो. गं. आरसेवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

D-16

Circulate

F:\Sushilkumar\२०२२\१०५_२०२२ Rajiv Gandhi Pragati Abhiyan.docx

तात्काळ

महाराष्ट्र शासन

मनु कुमार श्रीवास्तव
मुख्य सचिव

अ.शा.प.क्र.रागांप्र १९२२/प्र.क्र.४०/१८-अ,
सामान्य प्रशासन विभाग
हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-०० ०३२
दिनांक : १८/०८/२०२२

विषय : "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२२-२३ या वर्षाकरिता दि.२० ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरावर राबविण्याबाबत.

प्रिय श्री/श्रीमती

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय क्रमांक : प्रसुधा १११९/प्र.क्र.३/१८-अ, दिनांक ३ फेब्रुवारी २०२१ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सर्व स्तरावर राबविण्याच्या या विभागाच्या दिनांक ३/२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ येथे १ ते ७ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०२२-२३ या वर्षाकरिता उक्त अभियान व स्पर्धा राबविणे आवश्यक आहे.

१) अभियान कृती कालावधी प्रतिवर्षी दिनांक २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर असा दीड महिन्याचा असेल.

२) स्पर्धेसाठी विचारात घ्यावयाचा कालावधी, २० ऑगस्ट पासून एक वर्षाचा असेल. प्रशासकीय सुधारणेविषयी प्रस्ताव व कल्पना यासाठी मात्र कालावधीची अट नसेल.

३) उपविभागाचे मुख्यालय असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी उपविभागीय अधिकारी आणि इतर तालुक्यात तहसिलदार हे तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व गटविकास अधिकारी यांना निमंत्रित करतील व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सभेमध्ये प्रगती अभियानाची संकल्पना मांडतील. याच सभेमध्ये सहभागासाठी मा. विधानसभा सदस्य, मा.विधान परिषद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, व सभापती, पंचायत समिती यांना विशेष विनंती करतील.

४) जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावून जिल्ह्यातील सर्व मा.संसद सदस्य, मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, अध्यक्ष, जिल्हा परिषद यांना निमंत्रण करतील. याच बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच इतर जिल्हा स्तरावरील सर्व विभागप्रमुख यांना सुध्दा वरील बैठकीत निमंत्रित करतील व सदर योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत आवाहन करतील.

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६१, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in

५) महानगरपालिकास्तरावर महानगरपालिका आयुक्त, नागरी संस्थांचे सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत विनंती करतील. मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करुन मा.संसद सदस्य, मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, नगरपालिकेचे व महानगरपालिकेचे पदाधिकारी यांनाही बैठकीत आमंत्रित करतील.

६) विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त, सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबद्दल आवाहन करतील.

३. उपरोक्त नमूद अनु.क्र. १ ते ६ मधील तरतूदीप्रमाणे "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२२-२३ या वर्षाकरिता सर्व स्तरावर राबविण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी, ते ज्या जिल्ह्याचे पालक सचिव आहेत, त्या जिल्ह्यात बैठका आयोजित करण्याबाबत त्याचप्रमाणे विभागीय, जिल्हा, महानगरपालिका व तालुका स्तरावर कार्यवाही करण्याबाबत आपल्या विभागातील तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयातील सर्व संबंधितांना कृपया सूचना द्याव्यात.

आपला स्नेहांकित,

(मनु कुमार श्रीवास्तव)

प्रति

१. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

प्रत

२. विभागीय आयुक्त, सर्व महसूली विभाग, महाराष्ट्र
३. आयुक्त, सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र
४. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र
५. सर्व जिल्हा पालक सचिव
६. निवडनस्ती, कार्यासन १८-अ

Directorate Of Technical Education Maharashtra, Mumbai, India

**DESK16 Desk Officer <desk16@dtemaharashtra.gov.in>**

# Fwd: "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन 2022-23 या वर्षाकरीता दिनांक 20 ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरांतर राबविण्याबाबत...

2 messages

**Dr. Abhay Wagh** <director@dtemaharashtra.gov.in> Thu, Aug 25, 2022 at 10:15 AM
To: DESK16 Desk Officer <desk16@dtemaharashtra.gov.in>, "S.G. Randive" <sgrandive@dtemaharashtra.gov.in>, Dhanapal Kamble <dhanapal.kamble@dtemaharashtra.gov.in>

---------- Forwarded message ---------
From: **Mohan Gangadhar Arsewad** <do.asthahte-mh@mah.gov.in>
Date: Wed, Aug 24, 2022 at 6:27 PM
Subject: "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन 2022-23 या वर्षाकरीता दिनांक 20 ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरांतर राबविण्याबाबत...
To: Dattarya Kahar <dattatraya.kahar@nic.in>, AJIT MADHUKARRAO BAWISKAR <ajit.baviskar@nic.in>, SATISHJAGDEORAOTIDKE UNDERSECRETARY <satish.tidke@nic.in>, Pratap Lubal <ds.sashi-hted@mah.gov.in>, MAVI Shakha DHEPUNE <mavi.dhepune@nic.in>, DIRECTOR ART <directorateofart@gmail.com>, <director.dhepune@nic.in>, DIRECTOR LIBRARY <director.dol@maharashtra.gov.in>, DIRECTOR TECHNICAL <director@dtemaharashtra.gov.in>, Rajiv Mishra <rm@sirjj.mu.ac.in>, mavidhepune <mavidhepune@nic.in>
Cc: SUSHILKUMAR Assistant Desk Officer <sushilkumar.shinde@nic.in>

Please find attached herewith.

--
**Dr. Abhay Wagh**
Director
Directorate of Technical Education
Maharashtra State, Mumbai
www.dtemaharashtra.gov.in

**Rajiv Gandhi Abhiyan and compitition letter.pdf**
868K

**DESK16 Desk Officer** <desk16@dtemaharashtra.gov.in> Thu, Aug 25, 2022 at 11:36 AM
To: Regional Office <rooffice@dtemaharashtra.gov.in>, secretary@msbte.com

Assistant Director (NT),
Desk-16, DTE, Mumbai.
02230233476
[Quoted text hidden]

**Rajiv Gandhi Abhiyan and compitition letter.pdf**
868K